दिनांक १२/०६/२०२०

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक १) रामेश्वर कैलास चेळेकर, पोशि, २) अनिल रघुनाथ जायभाये, पोशि, दोन्ही नेमणुक - उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, औरंगाबाद ग्रा यांनी ३०,०००/- रु लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | १) रामेश्वर कैलास चेळेकर, वय २५ वर्ष, पोशि/१६०<br>२)अनिल रघुनाथ जायभाये, पोशि/८४०, दोन्ही नेमणुक-उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, औरंगाबाद ग्रा. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे चिकलठाणा, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| तपासी अधिकारी | :- | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ३०,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे व त्यांचे मित्राचे डब्बर वाहतुकीचे एकुण तीन हायवा वाहनावर पोलीस ठाणे फुलंब्री-चिकलठाणा हद्दीत कारवाई न करणेसाठी मासीक हप्ता म्हणून. |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | केंब्रीज-सावंगी बायपास रोडवर नारेगाव चौफुली येथे |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार व त्यांचे मित्र हे तीन हायवा वाहनाव्दारे डब्बर वाहतुकीचा व्यवसाय करतात. या वाहनावर पोलीस ठाणे फुलंब्री-चिकलठाणा हद्दीत कारवाई न करणेसाठी मासीक हप्ता म्हणून लोकसेवक रामेश्वर चेळेकर व अनिल जायभाये हे प्रति हायवा दहा हजार रुपये प्रमाणे ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करित असल्याबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे ३०,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक १२/०६/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, अनिल रघुनाथ जायभाये यांनी तक्रारदार यांच्याकडुन ३०,०००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्याने दोन्ही आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे चिकलठाणा, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद चे पोलीस अधिक्षक मा. श्री. अरविंद चावरीया, अपर पोलीस अधिक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी केली आहे. त्यांना सोबतच्या स्टाफने मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in